## प्रेसनोट दि. ०८.०७.२०२२

श्री.महादेव विष्णू सुर्यवंशी, वय ५८ वर्ष, व्यवसाय – सेवा निवृत्त शाखा अभियंता, पंचायत समीती कार्यालय वाळवा इस्लामपूर ता.वाळवा जि.सांगली रा. ऐश्वर्य बंगला,यशोधननगर,इस्लामपूर ता.वाळवा जि सांगली यांना ४८५००/- रुपये लाच स्विकारले नंतर रंगेहात पकडले सांगली लाच लुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई.

---

तक्रारदार हे शासकीय कंत्राटदार असून तक्रारदार यांना ग्रामपंचायत कार्यालय कारंदवाडी यांचेकडून दि.०२.०५.२०२२ रोजी कार्यरंभ आदेश मिळाला असून तक्रारदार यांनी काम पुर्ण केलेले आहे. तक्रारदार यांचे कामांची निविदा फाईल तत्कालीन शाखा अभियंता सुर्यवंशी यांनी स्वत:जवळ ठेवून घेतलेली होती. सुर्यवंशी हे १ महिन्यापुर्वी सेवा निवृत्त झालेले असून देखील सुर्यवंशी यांनी तक्रारदार यांना कामाचे मोजमाप पुस्तकाचे (एम.बी चे) काम पुर्ण करून पंचायत समीती कार्यालयातून बिल काढून देण्यासाठी श्री.सुर्यवंशी, निवृत्त शाखा अभियंता यांनी ५०,०००/- रूपये लाचेची मागणी केली असल्याबाबतचा तक्रारी अर्ज तक्रारदार यांनी दि.२७.०६.२०२२ रोजी अँन्टी करप्शन ब्युरो सांगली कार्यालयास दिला होता.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीनुसार दिनांक २७.०६.२०२२ रोजी, दि.२८.०६.२०२२ रोजी, दि.०७.०७.२०२२ व आज दि.०८.०७.२०२२ रोजी ब्युरोच्या कार्यप्रणालीप्रमाणे पडताळणी केली असता त्यामध्ये श्री.सुर्यवंशी यांनी तक्रारदार यांनी पुर्वी केलेल्या कामाचे एम.बी.चे काम पुर्ण करून दिल्याच्या मोबदल्यात तसेच सध्या पुर्ण केलेल्या कामाचे एम.बी.चे काम पुर्ण करून पंचायत समीती कार्यालयातून बिल काढून देण्यासाठी बिलाच्या रक्कमेच्या टक्केवारी प्रमाणे ४८५००/- रुपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर आज दि.०८.०७.२०२२ रोजी श्री.महादेव विष्णू सुर्यवंशी, सेवा निवृत्त शाखा अभियंता यांचे विरूध्द त्यांचे राहत्या घरी सापळा लावला असता श्री.महादेव विष्णू सुर्यवंशी यांनी तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी करून ४८५००/- रूपये लाच रक्कम स्विकारले असताना त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे.

त्या अनुषंगाने श्री.महादेव विष्णू सुर्यवंशी, वय ५८ वर्ष, व्यवसाय – सेवा निवृत्त शाखा अभियंता, पंचायत समीती कार्यालय वाळवा इस्लामपूर ता.वाळवा जि.सांगली रा. ऐश्वर्य बंगला,यशोधननगर,इस्लामपूर ता.वाळवा जि. सांगली यांचे विरुध्द इस्लामपूर पोलीस स्टेशन येथे लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियमाखाली गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही सुरु आहे.

सदरची कारवाई मा. श्री. राजेश बनसोडे सो पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक, श्री. सुरज गुरव सो, अपर पोलीस उप आयुक्त/अपर पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे यांचे मार्गदर्शनाखाली श्री. सुजय घाटगे, पोलीस उप अधीक्षक, श्री.दत्तात्रय पुजारी पोलीस निरीक्षक, पोलीस अंमलदार अविनाश सागर, धनंजय खाडे, प्रितम चौगुले, राधिका माने, संजय संकपाळ, भास्कर भोरे, सलिम मकानदार यांनी केली आहे.

नागरिकांना आवाहन करण्यात येते की, लाच मागणी संबंधाने तक्रारी असल्यास पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक, विभाग, बदाम चौक, सांगली. येथे अथवा कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक ०२३३/२३७३०९५ वर तसेच हेल्प लाईन क्रमांक १०६४ वर तसेच व्हॉट्स अँप नंबर ७८७५३३३३३३ व मोबाईल नंबर ८९७५६५१२६२ तसेच खालील संकेतस्थळावर संपर्क साधावा.

संपर्क :-

१) मोबाईल अँप - www.acbmaharashtra.net
२) फेसबुक पेज - www.facebook.com-maharashtraACB
३) वेबसाईट – www.acbmaharashtra.gov.in

(सुजय घाटगे)
पोलीस उप अधीक्षक
अँन्टी करप्शन ब्युरो, सांगली.